# शाश्वत तत्त्व, अनंत तत्त्व

१ सप्टेंबर, २०२५

आत्मीय वाचक,

या वर्षी १ जानेवारीला, ‘मधुर सरप्राइझ्’च्या दरम्यान आपल्या श्रीगुरू, गुरुमाई चिद्विलासानंद यांनी आपल्याला एक प्रश्न विचारला होता. श्रीगुरुमाईंनी विचारले होते, “शाश्वतता आणि अनंतता यांमध्ये काय फरक आहे?”

एक लेखिका म्हणून मला वाटते की, माझ्यासाठी हे स्वाभाविकच होते की, मी माझ्या प्रवृत्तीनुसार शब्दांच्या अर्थाचे विवेचन करण्याचा दृष्टिकोण ठेऊन या प्रश्नाचे उत्तर द्यावे. मला माहीत होते की, *शाश्वतता* या शब्दाचा संबंध समयाशी आहे. शाश्वतता म्हणजे अनंत काळ, कधीही न थांबणारा समय, असा समय ज्याचा ना आरंभ आहे, ना अंत. आणि, *अनंतता* या शब्दाचा विस्तार अधिक व्यापक आहे. अनंतता म्हणजे अपरिमितता, अनंतपारता, ब्रह्मांडीय असीमितता. *अनंतता* हा शब्द जरी समयाशी संबंधित असला, तरी याचा प्रयोग अधिकांशपणे स्थानाच्या संदर्भात किंवा एखाद्या गोष्टीचे माप किंवा मात्रा अथवा त्याची सीमा वा व्यापकता दर्शवण्यासाठी केला जातो.

काही काळासाठी तर या उत्तराने माझे समाधान झाले. या शब्दांच्या अर्थांमधील फरक ओळखून [अथवा, निदान त्यांच्यामधील एक मूलभूत फरक ओळखून], मला वाटले की, मी श्रीगुरुमाईंच्या प्रश्नाचे यथोचितपणे उत्तर दिले आहे. परंतु माझ्या मनात असे काहीतरी नक्कीच राहून गेले असावे, ज्याची अद्याप उकल झालेली नव्हती, कारण अलीकडे मी या प्रश्नावर पुन्हा विचार करू लागले. मी विचार करू लागले : *श्रीगुरुमाईंनी आपल्याला हा प्रश्न का विचारला? शाश्वतता आणि अनंतता यांच्यामधील फरकाचे विश्लेषण करून आपल्याला काय समज मिळू शकते?*

म्हणून मी थोडासा शोध घेतला. मी माझ्या वडलांशी चर्चा केली जे शास्त्रज्ञ आहेत. मी अनेकदा विचारलेल्या प्रश्नांना [आणि अर्थातच अगदी मूलभूत प्रश्नांना] त्यांनी शांतपणे उत्तरे दिली. या प्रक्रियेमध्ये अशी एक गोष्ट मला समजली की, जी हे पत्र वाचत असलेल्या भौतिकशास्त्रज्ञांना निश्चितपणे आधीच स्पष्टतः ज्ञात असेल. आणि ती गोष्ट म्हणजे, एक अशी परिस्थिती अस्तित्वात आहे, जिच्यात स्थान आणि समय यांच्यामधील भेद नाहीसा होतो—जिथे शाश्वत, अनंत होते आणि अनंत, शाश्वत होते.

ही परिस्थिती आहे, *प्रकाश.*

शास्त्रज्ञांनी हा शोध लावला आहे की, प्रकाशाच्या गतिमानतेमध्ये, समय थांबतो आणि दोन गोष्टींच्या मधील अंतर हे आकुंचन पावून शून्य होते. याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे, रात्रीचे आकाश—काळ्या स्फटिकासम चमकदार असे ताऱ्यांनी आच्छादलेले आकाश. आपल्या ब्रह्मांडात सगळ्यात दूर स्थित असलेल्या काही ताऱ्यांपासून पृथ्वीपर्यंत प्रकाश पोहोचण्यास *अब्जावधी* वर्षे लागू शकतात. याचा अर्थ असा होतो की, ज्या वेळी आपण तो प्रकाश आपल्या डोळ्यांनी पाहत असतो, त्या वेळेपर्यंत त्या ताऱ्याचे कदाचित स्थलांतर झालेले असेल अथवा त्याचे अस्तित्वच समाप्त झालेले असेल. म्हणून आपण जेव्हा आकाशाकडे पाहतो, तेव्हा खरेतर आपण भूतकाळ पाहत असतो.

आता, हाच घटनाक्रम जर आपण *प्रकाशाच्या* दृष्टिकोणातून पाहिला तर काय होईल? वास्तविकता काहीतरी निराळीच असेल! पाहा, आपल्याला ज्या प्रकारे समयाची अथवा गोष्टींच्या मधील अंतराची अनुभूती होते, तशी प्रकाशाला होत नाही. अब्जावधी प्रकाशवर्षे दूर स्थित असलेल्या ताऱ्यापासून ज्या क्षणी प्रकाश प्रसरित होतो—प्रकाशाच्या दृष्टिकोणातून—त्याच क्षणी तो प्रकाश इथे या पृथ्वीवर *देखील* असतो आणि आपण आपल्या डोळ्यांनी तो प्रकाश पाहत असतो. दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे झाल्यास, प्रकाश हा कालखंडांच्या मधील संधिकाल नाहीसा करतो. प्रकाश हा स्थानांमधील अंतर समाप्त करतो. प्रकाश शाश्वत आहे. प्रकाश अनंत आहे.

मी कोणत्याही अर्थाने भौतिकशास्त्रज्ञ वा गणितज्ञ नाही. परंतु मी जेव्हा प्रकाश, स्थान आणि समय यांविषयीच्या तथ्यांबद्दल जाणले, तेव्हा मला असे आढळून आले की, हे सर्व मनाला भ्रमित करणारे तर आहेतच, पण त्याबरोबरच त्यांच्यात गहन आंतरिक ज्ञान जागृत करण्याची क्षमतादेखील आहे. सिद्धयोग मार्गावर आपण श्रीगुरुमाईंकडून शिकलो आहोत की, प्रकाश भगवंताचे स्वरूप आहे. आपली उत्पत्ती प्रकाशापासूनच झाली आहे आणि आपण अंततः प्रकाशातच विलीन होणार आहोत. श्रीगुरू आपल्या अंतरी प्रकाशाचीच जागृती करतात; आपण इतरांमध्ये, आपल्या सभोवतालच्या जगात प्रकाशच पाहतो. जेव्हा मला श्रीगुरुमाईंचे दर्शन होते, तेव्हा माझे हृदय प्रकाशानेच ओतप्रोत होते आणि प्रकाशच बाहेर ओसंडून वाहतो. मला जेव्हा स्वप्नांमध्ये श्रीगुरुमाई दिसतात, तेव्हा प्रकाशच त्या स्वप्नांच्या सीमांना लुप्त करतो, त्यामुळे ती स्वप्ने अनोखी वाटतात, वास्तविक वाटतात, जणूकाही ती स्वप्नावस्था आणि जागृतावस्था यांच्या पलीकडे असतात. अतः, माझे अध्ययन आणि माझे अनुभव या दोहोंच्या आधारे मला हे समजले आहे की, जर असे काहीतरी असेल जे समयाला थांबवू शकते—जर असे काहीतरी असेल जे स्थानाच्याही पलीकडे जाऊ शकते—तर तो आहे, प्रकाश.

श्रीगुरुमाई यांच्याद्वारे लिखित कवितांपैकी माझी एक आवडती कविता आहे, “As the Light Comes Streaming Down,” जी त्यांचे पुस्तक *Pulsation of Love* [१] [पल्सेशन् ऑफ लव्ह]

यामध्ये आहे. या कवितेत श्रीगुरुमाईंनी प्रकाश आणि समय हे विषय एकमेकांत गुंफले आहेत आणि त्या आपल्याला प्रेरित करतात की, आपण त्यांच्यातील संबंधाच्या स्वरूपावर सखोलतेने विचार करावा. कवितेच्या आरंभी श्रीगुरुमाई लिहितात :

प्रकाश जसजसा प्रवाहित होतो आहे,
    काल, आज आणि सदासर्वदा,
    पवन श्वेत वस्त्रांनी सुशोभित आहे.
नद्यांमध्ये जणूकाही दूध वाहते आहे.
संपूर्ण धरणी प्रेमाच्या ओलाव्याने
    प्रफुल्लित होते आहे.
भगवंताच्या करुणेने आणि
त्याच्या अनंत आशीर्वादांनी ओथंबलेले
    हृदयदेखील आपली कृतज्ञता प्रकट करते आहे.

सर्व समय भगवंताचा समय आहे,
    आणि भगवंताचा समय शाश्वतता आहे.
प्रत्येक जीवात्म्याला त्याच्या सखोलतेत ही गोष्ट ठाऊक असते,
    परंतु जे तो जाणतो, त्याचे स्मरण त्याला नेहमीच राहत नाही.
कृतज्ञता जीवात्म्याचा गुणधर्मच आहे.

सर्व समय हा भगवंताचा समय आहे,
    ही गोष्ट स्मरणात न ठेवल्याने,
    तुम्ही फक्त त्यासाठीच कृतज्ञ असता
    जे वरवर चांगले भासते.
तुमचा जेव्हा जन्म होतो, तेव्हा तो भगवंताचे आभार मानण्याचा समय आहे.
जीवन जेव्हा चालू असते, तेव्हा तो भगवंताचे आभार मानण्याचा समय आहे.
तुमचा जेव्हा मृत्यू होतो, तेव्हा तोदेखील भगवंताचे आभार मानण्याचा समय आहे.
हा प्रकाश सदैव एक आशीर्वाद आहे.
हा प्रकाश करुणाच आहे.

सर्व समय भगवंताचा समय आहे. प्रत्येक क्षण हा त्यापर्यंत पोहोचण्यासाठीचे द्वार उघडतो, जे विश्वातीत आहे. श्रीगुरुमाई हेच शिकवतात.

तर मग, आपण या बोधासह जगण्याची निरंतरता कशा प्रकारे टिकवून ठेवावी? आपण आपले जीवन कशा प्रकारे जगावे, जेणेकरून आपण भगवंताच्या प्रकाशाकडे पुन्हापुन्हा परत येऊ? माझी अशी समज आहे की, हा प्रश्न आणि त्याच्याशी निगडित असलेली अनेक संभाव्य उत्तरे ही वर्ष २०२५च्या श्रीगुरुमाईंच्या संदेशाच्या सारतत्त्वामध्ये अंतर्भूत आहेत : *तुमचा वेळ हा तुमच्यासाठी लाभप्रद बनवा.*

या वर्षभरात, मी सिद्धयोग मार्गावर साजरे करण्यात येणाऱ्या महोत्सवांविषयी लिहित आले आहे आणि मी हेदेखील लिहिले आहे की, हे उत्सव सुस्पष्टपणे आपल्याला भगवत्प्रकाशाची अनुभूती करण्याच्या संधी देतात. आणि सप्टेंबर महिन्यात अशी संधी म्हणजे, नवरात्रोत्सव. नवरात्र हा नऊ रात्रींचा उत्सव आहे, ज्याचा उद्‌गम भारतात झाला; या वर्षी नवरात्रोत्सव २२ सप्टेंबरपासून ३० सप्टेंबरपर्यंत साजरा केला जाईल आणि २ ऑक्टोबरला दसऱ्याच्या सणासह याचे समापन होईल. हा महोत्सव देवी भगवतीचे पूजन-वंदन करण्यास समर्पित आहे, जी स्वतः प्रकाशरूपिणी आहे. त्याबरोबरच, *प्रकाशाने* देवीची उपासना करण्याची परंपरादेखील आहे, उदाहरणार्थ पूजा-अनुष्ठानांद्वारे किंवा गरबादीपाच्या आवतीभोवती नृत्य करून.

अर्थातच, भगवंताच्या प्रकाशाचे आवाहन करण्यासाठी आपल्याला सप्टेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत वाट पाहण्याची आवश्यकता नाही. आपण आत्ता, याच क्षणी असे करू शकतो, आज कोणत्याही वेळी करू शकतो व उद्या आणि त्याच्यापुढील प्रत्येक दिवशी करू शकतो. श्रीगुरुमाई त्यांच्या कवितेत सांगतात की, आपण हे कशा प्रकारे करू शकतो. आपण स्मरण करण्याचा अभ्यास करू शकतो आणि आपण कृतज्ञतेचा अभ्यास करू शकतो.

आपल्या अंतरी, इतरांमध्ये आणि आपल्या सभोवतालच्या जगामध्ये भगवंताचा प्रकाश ज्या-ज्या रूपात आपल्यासमोर प्रकट होतो त्यांपैकी काही प्रकटरूपांकडे दररोज लक्ष देण्याचा प्रयत्न तर आपण नक्कीच करू शकतो. ही प्रकटरूपे ‘मोठी’ असायलाच हवीत हे आवश्यक नाही. कदाचित आपल्याला त्या प्रकाशाची झलक एखाद्या पानाच्या शिरांमध्ये दिसेल अथवा एखाद्या वृक्षाच्या फांदीच्या हळुवारपणे डोलण्यामध्ये दिसेल, एखाद्या व्यक्तीच्या स्मितहास्यामध्ये किंवा एखाद्या व्यक्तीच्या गालांवरून ओघळणाऱ्या नाजूकशा एका अश्रूमध्ये दिसेल. आपल्याला करायचे फक्त इतकेच आहे की, आपण या क्षणांविषयी अधिक जागरूक व्हावे, त्यांच्याकडे लक्ष द्यावे म्हणजे त्यांची नोंद घ्यावी [उदाहरणार्थ, आपल्या जर्नलमध्ये लिहून] आणि मग जाणीवपूर्वक त्यांकरिता आपली कृतज्ञता व्यक्त करावी.

***

मला आनंद वाटतो की, मी आत्ता तुमच्याशी कृतज्ञतेविषयी बोलते आहे. मी हे करते आहे, याकरिता मी *कृतज्ञ* आहे. मी असे का म्हणते आहे?

मी असे म्हणते आहे, कारण आजचे हे पत्र, सप्टेंबरचे पत्र, मी या वर्षात तुम्हाला लिहित असलेले अखेरचे पत्र आहे. आणि गेल्या नऊ महिन्यांदरम्यान आपण केलेल्या सहयात्रेवर मी जेव्हा विचार करते, म्हणजे श्रीगुरुमाईंच्या नववर्ष-संदेशावर आपण वैयक्तिकरित्या आणि एकत्रितपणे जी साधना केली आहे, त्याविषयी मी जेव्हा मनन करते, तेव्हा मला जे जाणवते, ती आहे कृतज्ञता. मी जे अनुभवते आहे, ती म्हणजे माझ्या हृदयात उचंबळून येणारी कृतज्ञतेची भावना.

मी श्रीगुरुमाईंप्रति कृतज्ञ आहे, त्यांच्या नववर्ष-संदेशाकरिता, नववर्ष-संदेशाशी निगडित त्यांच्या शिकवणींकरिता [जसे की, 'समयाच्या समक्ष'], त्यांच्या प्रेमाकरिता आणि त्यांच्या कृपेकरिता, जे या जीवनात प्रत्येक क्षणी आणि प्रत्येक जन्मात आपल्यासोबत आहेत. मी तुमची म्हणजेच सिद्धयोगी तसेच नवीन जिज्ञासूंच्या संघम्‌चीदेखील खूप प्रशंसा करते की, तुम्ही माझ्या चिंतनबिंदूंशी इतक्या विचारपूर्वक कार्य केले आणि श्रीगुरुमाईंच्या नववर्ष-संदेशाविषयीचे तुमचे अनुभव सांगितले.

आता, यापुढेदेखील श्रीगुरुमाईंच्या नववर्ष-संदेशाचे आपले अध्ययन व अभ्यास सुरू राहतील. आपल्याकडे या वर्षातील चार महिने अजूनही शिल्लक आहेत आणि कोण जाणे की, यांदरम्यान आपल्याला कोणकोणत्या गोष्टींची नव्याने उकल होईल, कोणत्या अनुभूती होतील आणि आपल्यात कशा प्रकारचे रूपांतरण घडून येईल! तथापि, या वर्षानंतरही—कॅलेंडरचे हे चक्र पूर्ण झाल्यानंतरदेखील, म्हणजे ज्यामध्ये आपण गुरुमाईंच्या या संदेशावर केंद्रण करत आहोत—श्रीगुरुमाईंचे ज्ञान जिवंत राहील. त्यांचे हे ज्ञान प्रकाशाचेच नादरूप आहे, प्रकाशानेच विशिष्ट अक्षरांचा आणि शब्दांचा आकार धारण केला आहे, ज्यांचे आकलन करणे आपल्याला शक्य होते आहे. श्रीगुरुमाईंचा नववर्ष-संदेश शाश्वत आणि अनंत आहे, तो सदासर्वदा आपल्यासमवेत आहे.

याच विषयावर चर्चा सुरू ठेवत, मी तुम्हाला विचारू इच्छिते : तुम्ही कधी 'सोलर ॲनालेमा' पाहिला आहे का किंवा त्याविषयी ऐकले आहे का? ही एक आकृती असते किंवा कालावधीतील फरकाची एक प्रतिमा असते. संपूर्ण वर्षातील अनेक भिन्नभिन्न दिवशी, एकाच ठिकाणाहून, एकाच वेळी सूर्याची छायाचित्रे घेतली जातात आणि त्यांना एकत्र जोडले जाते. यामुळे, व्यतीत होणाऱ्या समयाबरोबर जी आकृती तयार होऊ शकते, ती म्हणजे 'सोलर ॲनालेमा'. प्रत्येक छायाचित्रात सूर्य एकाच जागी स्थित असल्याचे जरी भासत असले, तरी प्रत्यक्षात तो गतिमान आहे. याचे कारण असे की, पृथ्वी ही स्वतःच्या अक्षावर झुकलेली आहे [ज्यामुळे सूर्य वर-खाली जात असलेला दिसतो] आणि पृथ्वीच्या परिक्रमेचा पथ अंडाकृती आहे [ज्यामुळे सूर्य उजवीकडे अथवा डावीकडे जात

असल्याचे प्रतीत होते]. तुम्ही अंदाज बांधू शकता का की, सूर्याच्या या सर्व छायाचित्रांपासून तयार होणारा संयुक्त आकार कसा असतो?

तो आकार आहे, इंग्रजी अंक आठचा [8], ज्याला आपण *infinity* म्हणजे 'अनंतते'चे चिह्नदेखील मानतो. किती अद्‌भुत मेळ आहे हा, होय ना? माझ्यासाठी हा एक संकेत आहे. समयातीततेच्या पटलावर समय स्वतःची लीला रचतो. आपण जिथे कुठेही असू किंवा ज्या कोणत्या कालखंडात असू, आपण अनंततेची तीच आकृती सतत रेखाटत आहोत.

आदरपूर्वक,
ईशा सरदेसाई

© २०२५ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

---

[१] गुरुमाई चिद्विलासानंद, *Pulsation of Love* [साउथ फॉल्सबर्ग, न्यूयॉर्क : एस. वाय. डी. ए. फाउंडेशन, १९९०, २००१], पृ. ४७.